
REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# अण्णाभाऊ साठे यांच्या कथा-कादंबरीतील व्यापकता आणि विविधता




**प्रा.डॉ. डी. आर. गायकवाड**
मराठी विभाग, दयानंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.

## प्रास्ताविक :-

साहित्य ही एक कला आहे, तथापि केवळ लोकांचे मनोरंजन एवढेच साहित्य-कलेचे कार्यक्षेत्र मर्यादित नसून समाज परिवर्तनाचे ते एक साधन आहे. मानवी भाव-भावना, विचार-कल्पना तसेच चिंतन-मननाच्या आविष्काराचे साहित्य हे एक माध्यम आहे. अशी भूमिका घेऊन मराठी भाषेमध्ये ज्यांनी वैविध्यपूर्ण व वैशिष्ट्यपूर्ण साहित्यलेखन केले आहे. अशा महत्वाच्या लेखकांपैकी अण्णा भाऊ साठे हे एक होय. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक प्रकारच्या आव्हानांना सामोरे जात त्यांनी विपूल प्रमाणात साहित्यनिर्मिती करून मराठी साहित्याच्या समृद्धीत दिलेले योगदान निश्चितच महत्वपूर्ण ठरले आहे. अन्यायी संस्कृती, अनिष्ट चाली-रिती, रुढी-परंपरा विशेषतः व्यवस्थेमुळे अस्पृश्य समाजावर होणारे अन्याय-अत्याचार व आर्थिकतेमुळे त्यांची होणारी पिवळणूकी विरुद्ध आपल्या लेखनीतून वाचा फोडणारे अण्णा भाऊ साठे हे सामर्थ्यशाली लेखक तसेच देशभक्त होते. तत्कालीन ब्रिटिश विरुद्धच्या चळवळीत त्यांनी सहभाग घेतला. विशेषतः संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत सर्वाधिने स्वतःला झोकून देऊन त्यांनी अनेक लावणी, पोवाडे, लोकनाट्य आदींची निर्मिती करून श्रमिकांचे जीवन मांडले. ब्रिटिशांच्या अन्यायी जुलमाविरुद्ध आपल्या साहित्यातून बंड पुकारले. त्यासाठी अनेक कथा-कादंबऱ्यांची निर्मिती त्यांनी केली. प्रवासवर्णन लिहिले, त्यांनी निर्मिलेल्या समग्र साहित्यात प्रचंड विविधता व व्यापकता आहे. समाजक्रांतीकारक मार्क्स व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा सुरेख संगम त्यांच्या साहित्यात आढळतो. दीन-दुबळे, कष्टकरी, कामगारांना त्यांनी आपल्या साहित्याचे नायक बनविले. कष्टकरून, प्रामाणिकपणे जगण्यासाठी ते धडपडतात. अन्यायापुढे न झुकता त्याविरुद्ध प्रसंगी विद्रोह पुकारताना दिसतात. त्यांचे साहित्य म्हणजे मराठी साहित्यसृष्टीला लाभलेली एक सर्वश्रेष्ठ देणगीच होय. साहित्याची जणू खाण होय. प्रस्तुत ठिकाणी केवळ त्यांच्या निवडक कथा व कादंबऱ्यांचा वरील दृष्टिकोनातून अभ्यास अपेक्षित आहे. सदर अभ्यासासाठी वर्णनात्मक व तुलनात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे.

मराठीतील क्रांतिकारक लेखक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा जन्म सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव येथे १ ऑगस्ट १९२० रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव भाऊ सिधोजी साठे, तर आईचे नाव बालाबाई होते. त्यांचे मुळ नाव तुकाराम होते. १९३२ मध्ये जगण्यासाठी अण्णाभाऊ साठे मुंबईला वडिलांसोबत गेले. तेथे त्यांनी कष्टाची अनेक कामे केली. १९३६ च्या दरम्यान मुंबई येथे गिरणीकामगार म्हणून काम करताना मालकांकडून कामगारांवर होणारा अन्याय-अत्याचार त्यांनी जवळून पाहिला, अनुभवला, त्यामुळे ते प्रचंड अस्वस्थ झाले. मुळच्या बंडखोर वृत्तीच्या अण्णाभाऊंची भेट तत्कालीन भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे नेते कॉ. श्रीपाद अमृत डांगे यांच्याशी झाले आणि ते पुढे कम्युनिस्ट पक्षाचे क्रियाशील कार्यकर्ते झाले. येथील विविध कामगार

चळवळीत ते सक्रिय राहिले, तथापि वडिलांच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी अंगावर पडल्याने ते पुन्हा आपल्या मुळे वाटेगावी आले. घरातील आठराविश्व दारिद्र्यामुळे अण्णाभाऊंनी येथे मोल-मजुरीची कामे केले. चुलत भाऊ बापू साठे यांच्या तमाशाच्या फडात ते काम करू लागले. सामजिक भान असणारे ते कलावंत होते, त्यांची प्रतिभा या नंतरच्या काळात अधिक बहरतच गेली.

देशात ब्रिटिशांची सत्ता होती, त्यांच्या जुलमाला भारतीय जनता कंटाळली होती. संपूर्ण देशात ब्रिटिश विरोधी आंदोलनाने उग्र रूप धारण केले होते. कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करायचा नाही, या वृत्तीच्या अण्णाभाऊंनी १९४२ च्या ब्रिटिश विरोधी ''छोडो भारत'' आंदोलनात सहभाग घेतला. तेव्हा ब्रिटिश सरकारने त्यांच्याविरुद्ध अटक वॉरंट काढले. पोलिसांना चुकवीत ते पुन्हा मुंबईला आले. येथे त्यांनी शाहीर अमर शेख व गव्हाणकर यांच्या मदतीने स्वतंत्र्यरित्या 'लाल बावटा' कलापथकाची स्थापना केली. आपल्या शाहिरीच्या माध्यमातून ब्रिटिशांच्या अन्यायाला वाचा फोडली. लोकशाहीर म्हणून त्यांचा सर्वत्र लौकिक झाला. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी स्वतःला झोकून दिले होते. याकाळात त्यांनी अनेक लावणी, पोवाडे, गीते, वगनाट्ये आदिंची निर्मिती केली. 'महाराष्ट्राची परंपरा' या नावाने त्यांनी लिहिलेला पोवाडा तसेच 'मुंबई कुणाची' हे त्यांचे लोकनाट्य या काळात खुपच लोकप्रिय ठरले. पोवाडे, लोकनाट्ये आणि लावण्यांमधून अण्णाभाऊ साठे यांनी अन्याय, अत्याचार, जुलूम, शोषण, गुलामगिरी यांविरुद्ध बंड पुकारले, समतेचा पुरस्कार केला. 'जग बदल घालुनी घावा! सांगूनि गेले मज भीमराव!!' अशी डॉ. आंबेडकरांच्या कार्याला त्यांनी आदरांजली वाहिली. वैचारिक क्रांतिशिवाय समाजक्रांती शक्य नाही हे सूत्र डोळ्यापुढे ठेवून त्यांनी अनेक कथा-कादंबऱ्यांची निर्मिती केली आहे. 'खुळंवाडी' (१९५७, 'बरबाद्या कंजारी' (१९६०), 'भानामती' (१९६२), 'कृष्णाकाठच्या कथा' (१९६४), 'गजाआड' (१९६७), 'गुऱ्हाळ' (१९६९), 'लाडी' (१९६९), 'फरारी' (१९७९), 'जिवंत काडतूस' (१९७७), 'आंबी' (१९६१), 'नवती' (१९७५), 'चिरागनगरची भूतं' (१९७८), 'निखारा' (१९७०), 'ठासलेल्या बंदुका' (१९७८), 'भुताचा मळा' (१९७८), 'रानवेली' (१९७८), 'राम-रावणयुद्ध' (१९७८) व 'भोमक्या आणि इतर कथा' (१९७८) आदि त्यांचे कथासंग्रह आज प्रसिद्ध आहेत. तर 'वारणेच्या खोऱ्यात' (१९५१), 'चित्रा' (१९५१), 'फकिरा' (१९५९), 'वैजयंता' (१९५९), 'चंदन' (१९६२), 'अलगूज' (१९६१), 'माकडीचा माळ' (१९६३), 'आवडी' (१९६३), 'गुलाम' (१९६४), 'वैर' (१९६३), 'चिखलातील कमळ' (१९६५), 'धुंद' (१९६६), 'कुरुप' (१९६६), 'तारा' (१९६७), 'अहंकार' (१९६७), 'मथुरा' (१९६८), 'वारणेचा वाघ' (१९६८), 'पाझर' (१९६९), 'रानगंगा' (१९६९), 'अग्निदिव्य' (१९६९), 'रानबोका' (१९६९), 'आघात' (१९६९), 'केवड्याचं कणीस' (१९६९), 'आग' (१९६९), 'संघर्ष' (१९६९), 'रूपा' (१९६९), 'पूर्ती' (१९७०), 'मंगला' (१९७१), 'डोळे मोडीत राधा चाले' (१९७१), 'मास्तर' (१९७५), 'रत्ना' (१९७५) व 'फुपाखाना' (१९७७) आदी जवळ जवळ त्यांच्या पस्तीस कादंबऱ्या आज प्रसिद्ध आहेत. त्यांच्या 'फकीर' या कादंबरीचे २७ भाषेतील अनुवाद प्रसिद्ध असून महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीचा पुरस्कार या कादंबरीला लाभला आहे. आपली ही सर्वोत्कृष्ट कलाकृती त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडरांना क्रांतिकारक विचारकार्याला अर्पण केली आहे. वाचकांच्यात नवी सामाजिक जाणीव आणि नवे क्रांतिभान निर्माण करणाऱ्या अण्णाभाऊ साठे यांच्या वरील कथा-कादंबऱ्यात प्रचंड व्यापकता आणि विविधता आढळते. अण्णाभाऊंनी आपल्या जीवनालाच साहित्यरूप दिले आहे. जे जीवन जगले, भोगले, अनुभवले व पाहिले तेच आपल्या कथा-कादबरीत प्रामाणिकपणे मांडले असे सांगणारे अण्णाभाऊ साठे हे सत्यशोधक साहित्यिक होते. बुद्ध, मार्क्स, फुले, शाहू व घटनेचे शिल्पकार डॉ. आंबेडकर या महापुरुषांनी निर्माण केलेल्या प्रबुद्ध विचारांचा वारसा त्यांनी आपल्या कथा-कादंबरीतून चालविला. केवळ वाचकांचे मनोरंजन करण्यासाठी त्यांनी साहित्य लेखन केले नाही, किंबहुना ती त्यांची भूमिकाही नव्हती. साहित्य समाजाचा आरसा आहे, समाजाची मने आणि मते बनविण्याची आणि बदलविण्याची शक्ती साहित्यात आहे. याची त्यांना चांगली जाणीव होती. त्यासाठीच आपली लेखनी ते चालवित होते. त्यांच्या कथा-कादंबरीतून येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या प्रामुख्याने अस्पृश्य समाजातील महार, मांग, चांभार, ढोर तसेच भटके, आदिवासी, डोंबारी, रामोशी, कातकरी आदि विविध जातीजमातींतील आहेत. जगण्यासाठी वाटेल ती कामे करण्याची त्यांची तयारी असते. अगदी ओझी वाहण्यापासून ते कागदाचे तुकडे गोळा करणे, झाडू मारणे, सफाईची कामे करणे, हमाली करणे, प्रसंगी चोऱ्या-माऱ्या, दरोडे घालणे परंतु हे सर्व ते केवळ पोटाची भूक भागविण्यासाठी करतात. जगण्यासाठी ती धडपडतात. प्रसंगी अन्यायाविरुद्ध संघर्षासही ती तयार असतात. अन्यायी, विषम समाजव्यवस्थेमुळे दलित समाजातील विविध

जाती-धर्मातील लोकांना कोणकोणत्या संकटांना सामोरे जावे लागते हे दाखवितानाच त्यांची पात्रे ही अन्यायाला बळी पडत नाहीत, तर अन्यायाविरुद्ध, झुंजतात, प्रसंगी बंड करून उठतात. हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्ये होय. विशेष म्हणजे अण्णाभाऊ साठे यांनी हे एवढ्या कौशल्याने रेखाटले आहे की, जाणीवपूर्वक यासाठी ते कांही प्रयत्न करतात असे कोठेही वाटत नाही. अगदी स्वाभाविकपणे हे घडते आहे असे वाटते. आपणही एक माणूस आहोत इतरांप्रमाणे आपल्यालाही जगण्याचा हक्क आहे. हे येथील व्यक्तीरेखाकातून सहजतेने प्रकटते. त्यांच्या कथा, कादंबरी वाचकांना एका विशिष्ट उंचीवर घेऊन जातात व माणुसकीचे दर्शन घडवितात. त्यांच्या या कथालेखनाविषयी प्रसिद्ध लेखक प्र.के. अत्रे म्हणतात. ''अण्णाभाऊ साठे यांच्या कथांचे एका वाक्यात वर्णन करावयाचे झाल्यास असे सांगता येईल की त्या जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या कथा आहेत.'' खरोखरच जगण्यासाठी लढणाऱ्या माणसांच्या अण्णाभाऊंच्या कथा-कादंबऱ्या आहेत. दलितांचे जीवन केवळ गुन्हेगारीचे दुर्गुणांचे, भणंगपणाचे, लाचारीचे आहे असे भासविणाऱ्या काळात अण्णाभाऊंनी आपल्या लेखनातून दलितांचे जीवनही माणुसकीचे, इच्छाशक्तीचे, अन्यायाविरुद्ध झुंजणारे, आशा-आकांक्षा बाळगणारेही आहे हे वाचकांच्या मनावर ठरविण्यात यशस्वी ठरतात. अस्पृश्य समाजातील विविध जाती-धर्मातील लोकांना जगण्यासाठी किती व कोणकोणत्या प्रकारचा, संघर्ष करावा लागतो, याचे विदारक सत्यच त्यांच्या कथा-कादंबऱ्यावर प्रकटते. यादृष्टीने त्यांची प्रत्येक कलाकृती महत्वाची ठरते. उदाहरणार्थ 'बरबाद्या कंजारी' या कथेतील सुलतान पोटभर अन्न मिळावे म्हणून प्रचंड कष्ट करतो, पोटची खळगी भरण्यासाठी शेवटी तुरुंगात जातो. तेथे जेलरशी त्याचा संघर्ष होतो. तर 'सूड' कथेतील मारूती पोतराज हा महार आपल्या बायको व मुलांचे पोट भरण्यासाठी लक्ष्मीच्या नावाने भिक्षा मागतो. त्यांच्या अज्ञानपणाचा फायदा घेऊन सवर्ण समाजातील धन-धांडगे त्यांची जमीन बळकावतात, त्याला लुबाडतात. जगण्यासाठी अस्पृश्यांना उष्ट्या पत्रावळयातील अन्न खावे लागते तर काहींना जगण्यासाठी चोरी करावी लागते.

मुंबईच्या झोपडपट्टीतून राहणारा माणूस अण्णाभाऊंच्या कथा-कादंबऱ्यातून मोठ्या प्रमाणात आला आहे. दारिद्र्यामुळे त्यांना भोगावे लागणारे दुःख, पोटची भूक भागविण्यासाठी त्यांना करावी लागणारी विविध प्रकारची कष्टाची कामे, स्त्रियांना करावी लागणारी कामे त्यांचे यातनामय जीवन जगण्यासाठी अन्याय-अत्याचाराविरुद्ध करावा लागणारा संघर्ष मोठ्या कौशल्याने अण्णाभाऊ साठे, आपल्या कथांतून मांडला आहे. यादृष्टिने 'खुळंवाडी', 'स्मशानातील सोनं', 'भानामती', 'गजाआड', 'लाडी', 'गुऱ्हाळ', 'चिराग', 'नगरीची भुतं', संग्रहातील कथा 'वेताळ', 'चंगीझखान,' 'रम्मी', 'अडीच आंधळे', 'दोन भुतं' आदी कथेतील व्यक्तीरेखा महत्वाच्या ठरतात. त्यांच्या जगण्या-वागण्याची तऱ्हाच वेगळी आहे. मुंबईच्या झोपडपट्टीतील अण्णाभाऊंनी रेखाटलेलं जीवन वाचताना मन प्रचंड अस्वस्थ होते. माणसांना जगण्यासाठी किती व कोणकोणत्या प्रकारचा संघर्ष करावा लागतो. किती, कष्टाची कामे करावे लागतात. येथील लोकांच्यातील दारिद्र्य, अंधश्रद्धा, व्यवसनाधिनता, लोकांच्यातील नैराश्य, माणूसपण हरवलेली ही सर्वच माणसे अण्णाभाऊ साठे प्रत्ययकारी रीतीने रेखाटतात. जगण्यासाठीही माणसं अक्षरशः लढताना दिसतात.'

अण्णाभाऊ साठे यांची सर्वाधिक बहुचर्चित व लोकप्रिय ठरलेली कादंबरी म्हणजे 'फकिरा' ही होय मातंग समाजाचे साहसी दर्शन या कादंबरीतून घडते. ही कादंबरी नायकप्रधान आहे. राणोजी मांग व मुलगा 'फकिरा' हा शूर, वीर, पराक्रमी आहे. अशा या समाजावर विविध प्रकारचे अन्याय कसे होतात ते रेखाटतानाच वाटेगाव तसेच वारणा खोऱ्यातील लोकजीवन व निसर्गाचे लेखकाने केलेले चित्रण प्रचंड आकर्षक झाले आहे. येथील सण, उत्सव, यात्रा त्या निमित्ताने भरणारे तमाशाचे फड अण्णाभाऊ साठे अत्यंत सोप्या व सहज भाषेत साकारतात. ही कादंबरी वाचताना त्यातील घटना-प्रसंगाचें चित्र डोळ्यापुढे उभे राहते. जाणीवपूर्वक त्यांनी या कादंबरीची निर्मिती करून समाजापुढे एक आदर्श निर्माण केला आहे. अन्यायाविरुद्ध झुंजणारा त्यांचा बंडखोर नायक प्रचंड लोकप्रिय ठरला. त्यांच्या या कादंबरीविषयी डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''सर्वसामान्य माणसाला भावणारं, त्यांच्याच जीवनाचं प्रतिबिंब त्याला साहित्यात दाखवून देणारं प्रत्ययकारी लेखन अण्णाभाऊंनी केलं आहे. त्यांची पात्रे बंडखोर आणि शूर आहेत. त्यांच्यात अन्यायाविरुद्ध झुंज घेण्याची आणि प्राण पणाला लावण्याची हिंमत आहे. सामान्य माणसाच्या जीवनातलं उत्तुंग साहस व्यक्त करणं हे अण्णाभाऊंच्या लेखनाचं यश आहे. म्हणून अण्णाभाऊ साठे ह्यांची 'फकिरा' ही वाचकांची आवडती कादंबरी ठरली आहे.'' स्वतः लढतानाच इतरांनाही लढण्याची प्रेरणा देणारे, आयुष्यात माणसानं चांगलं काम करावे अशी शिकवण देणारे त्यांचे साहित्य व त्यांचे नायक लक्षात राहतात.' अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य हे वास्तववादी आणि जीवनवादी साहित्य

आहे. त्यांच्या साहित्यातून जगण्यासाठी लढणाऱ्या सामान्य माणसांचे वास्तववादी चित्रण कल्पकतेने प्रकटले आहे. त्यांचे साहित्य हे सामाजिक जाणीवांचे व सामाजिक बांधिलकेचे साहित्य आहे.

सारांश :-

अण्णा भाऊ साठे यांचे समग्र साहित्य विचारप्रवर्तक, क्रांतिदर्शी आहे. आपल्या साहित्यातून त्यांनी प्रामुख्याने भारतीय समाजव्यवस्थेतील तळागाळातील माणूस, समाज व संस्कृती मांडताना जातीव्यवस्थेमुळे व आर्थिक दुर्बलतेमुळे त्यांचे होणारे शोषण प्रत्ययकारी रितीने मांडले आहे. हे मांडताना त्यांनी निवडलेले कथानक, घटना-प्रसंग, व्यक्तिरेखा, उपयोजलेली जिवंत व जीवनदायी भाषा, निवेदन शैली व वातावरण आदींमुळे त्यांच्या कथा-कादंबऱ्या वाचनीय ठरतात. रोजच्या जगण्यातील प्रश्न शोधन नेमकेपणाने, अर्थपूर्ण शब्दांत मांडण्यासाठी अण्णाभाऊंची शैली अंतःकरणाला भिडते. समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी साहित्यलेखन केले. तथापि अलिकडच्या काळात कांही अभ्यासक अण्णा भाऊ साठे आणि त्यांच्या साहित्याला एका विशिष्ट समाजाचा घटक बनवून त्यांचे व्यक्तिमत्व जातीकेंद्री व धर्मवादी करून संकुचित केले जात आहे. तर काहींकडून साहित्य विचारात त्यांना केवळ ललित लेखक, रंजनवादी, कलावादी ठरविले जात आहे हे बरोबर नाही. वास्तविक अण्णा भाऊ साठे यांनी आपल्या साहित्यात भारतीय समाजातील दबलेल्या व वंचित घटकांच्या हालाखीच्या जीवनाचे प्रखर चित्रण केले आहे. हे करताना त्यांनी आपल्या नायकाला कोठेही दुबळा दाखविला नाही, तर अन्यायाविरुद्ध बंड पुकारणारा लढवय्या नायक रांगविला आहे. परिणामी त्यांचे साहित्य वाचकांच्यात नवी सामाजिक जाणीव व नवे क्रांतिभान निर्माण करणारे विचार प्रवर्तक साहित्य ठरले आहे. अण्णा भाऊ साठे मार्क्सवादी की, डॉ. आंबेडकरवादी अशी वांझोटी चर्चा करून वितंडवाद निर्माण करून समाजात दुफळी निर्माण न होवू देता परिवर्तनाचा जागर करणाऱ्यांनी त्यांच्या साहित्याचा एक साधन म्हणून उपयोग केल्यास व त्यांचे साहित्य अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविल्यास समाजपरिवर्तनाचा लढा अधिक गतिमान करता येईल असे वाटते. त्या दृष्टिने प्रयत्न व्हावेत. त्यांच्या समग्र साहित्याचा बदललेल्या काळाच्या पार्श्वभूमीवर नव्याने चिकित्सक अभ्यास व्हावा. ज्यामुळे त्यांनी मराठी साहित्यात दिलेले योगदान, त्यांच्या साहित्य लेखनाचा वेगळेपणा, प्रेरणा, प्रवृत्ती लक्षात येईल. तसेच त्यांच्या अलौकिक व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकता येईल. त्यांच्या साहित्यावर स्थळ, काळ, अवकाशाचा प्रभाव कसा पडला आहे. तत्कालीन लेखकांहून त्यांच्या लेखनाचा वेगळपणा कोणता? इत्यादी घटक लक्षात यावेत म्हणून हा लेखन प्रपंच. शेवटी चांगली साहित्यकृती ही एक कलाकृती असते, तसेच ते सामाजिक दस्ताऐवज असते, या दृष्टिने अण्णा साठे यांचे साहित्य श्रेष्ठ दर्जाचे ठरते. 'माणूस' म्हणून जगू पाहणाऱ्यांना सामर्थ्य देणारे त्यांचे साहित्य आहे.

## संदर्भ :-


१) गो.मा. पवार व म.द. हातकणंगलेकर, ग्रंथ संपादित, मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप (१९५०-१९७५), पॉप्युलर प्रकाशन, प्रा.लि. मुंबई.
२) डॉ. गंगाधर पानतावणे, दलित वाङ्मय (१९५०-२०००) मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड सातवा, भाग चौथा, मराठी साहित्य परिषद, पुणे, पहिली आवृत्ती २७ मे २०११.
३) डॉ. सारीपुत्र तुपेरे, आंबेडकरवादी समीक्षारूपे, शब्दाली प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २०१४.
४) डॉ. प्रकाश कुंभार, दलित कथासाहित्य, प्रियदर्शी प्रकाशन, कोल्हापूर.